**जिल्हा परिषद,यवतमाळ**
**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय**
**शिक्षण विभाग,प्राथमिक**
**जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत,आर्णी रोड,यवतमाळ**

E-mail – copriytl@gmail.com Website:-www.zpyavatmal.gov.in

जा.क्र.यजिप/शिविप्रा/आस्था-प्राथ/कावि/२७५८/२०२६ दिनांक:-०५/१०/२०२६

**प्रति,**

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत
पवित्र पोर्टलद्वारे नियुक्त
EWS महीला उमेदवार

**विषय**:-पवित्र पोर्टलद्वारे शिफारस पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबत (EWS महीला)

**संदर्भ**:- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ०१/०१/२०२६, दिनांक २०/०१/२०२३, दिनांक ३०/०३/२०२६, दिनांक ०२/०४/२०२६, दिनांक २४/०७/२०२६
२. मा. आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र क्र.मरापप/पवित्र पोर्टल/पदभरती/२०२६/दिनांक २८/०८/२०२६
३. समुपदेशन दिनांक १५/०९/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी-२०२५ नुसार शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत मुलाखतीशिवाय पदनिवडीचा विकल्प दिल्यानुसार पवित्र पोर्टल प्रणालींतर्गत शासनाने शिफारस केलेल्या शिक्षक पदभरतीतील एकुण ५१० उमेदवारांची निवड यादी कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्यानुसार शिफारस पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन संदर्भ क्र. ३ अन्वये पात्र उमेदवारांना समुपदेशनाने पदस्थापना देण्यात आलेली आहे.

तथापि सदर प्रक्रीयेत शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत **EWS महीला** या समांतर आरक्षणामध्ये एकुण १९ महीला उमेदवारांची शिफारस करण्यात आली असुन सदर उमेदवारांच्या दस्ताऐवजाची पडताळणी करण्यात आली असता विवाहीत महीला उमेदवारांनी वडीलांच्या कुटुंबाचे EWS प्रमाणपत्र सादर केले आहे.

सदर विवाहीत महीलांचे कुटंब बदलले असल्याने सदर शिफारस पात्र विवाहीत **EWS महीला** उमेदवारांनी त्यांचे पतीचे नावाचे EWS प्रमाणपत्र तपासणी करीता दिनांक ०६/१०/२०२६ रोजी समक्ष हजर राहुन कार्यालयास सादर करावे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलिपी**:-

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण आयुक्तालय पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner